ePaper

दिवंगत नेते राजीव सातव यांच्या पत्नी, आमदार प्रज्ञा सातव यांच्यावर हल्ला



|वर्ष - 6 |अंक - 294 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत

- महाविकास आघाडीला बंडखोरांची डोकेदुखी
- आमदार अपात्रतेच्या आधी निर्णय नको
- शेतकरी आंदोलनाचं लोण फ्रान्समध्ये

www.mahaenews.com | |गुरुवार, दि. 9 फेब्रुवारी 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# एप्रिलपासून कचऱ्याचा भुर्दंड!

## » घरगुती कचऱ्यापोटी दरमहा 60 व वार्षिक 720 रुपये शुल्क द्यावे लागणार

।पिंपरी। महाईन्यूज ।विशेष प्रतिनिधी।

**ओला, सुका आणि घरगुती घातक कचऱ्याच्या विलगीकरणापोटी नागरिकांना आता शुल्क मोजावे लागणार आहे. घरगुती कचऱ्यापोटी दरमहा ६० व वार्षिक ७२० रुपये महापालिकेला द्यावे लागणार आहेत. व्यावसायिकांना दरमहा ९० ते २०० रुपयांपर्यंत शुल्क द्यावे लागेल. हे सेवाशुल्क आकारण्याची कार्यवारी एक एप्रिलपासून केली जाणार असून घरपट्टीच्या बिलात ते दर्शविले जाणार आहे.**





महापालिका सर्वसाधारण सभेने २० ऑक्टोबर २०२१ रोजी कचरा विलगीकरण शुल्काच्या प्रस्तावास मान्यता दिली आहे. त्याची अंमलबजावणी करण्याबाबत प्रशासक शेखर सिंह यांनी सूचना जारी केली आहे. नागरिकांनी विघटनशील (कुजणारा किंवा ओला), अविघटनशील (न कुजणारा किंवा सुका), घरगुती घातक आणि सॅनिटरी वेस्ट असा वर्गीकृत केलेला कचरा स्वतंत्रपणे महापालिकेकडून नियुक्त एजन्सींकडे देणे गरजेचे आहे.

शंभर किलोग्रॅमपेक्षा कमी कचरा निर्मिती असलेली घरे, व्यावसायिक आस्थापना, हॉटेल, रुग्णालये, धार्मिक, शैक्षणिक, सांस्कृतिक संस्था, सरकारी किंवा निमसरकारी कार्यालये, मंगल कार्यालये, चित्रपटगृहे, खरेदी केंद्र, फेरीवाले यांच्याकडून प्रतिमहिना शुल्क आकारण्यात येणार आहे. तसेच, हंगामी दुकाने, सत्संग, मेळावे यांच्यासाठी मासिक शुल्क न आकारता एक वेळचे शुल्क निर्धारीत केले जाणार आहे.

### मालमत्तानिहाय शुल्क

» प्रतिघर : ६०
दुकाने, दवाखाने : ९०
शो-रूम : १६०
गोदामे, उपहारगृहे : १६०
लॉज व हॉटेल : २००
रुग्णालये : १६० ते २४०
शैक्षणिक, धार्मिक संस्था : १२०
सरकारी-निमसरकारी कार्यालये : १२०
मंगल कार्यालये, मॉल्स, चित्रपटगृहे : २०००
फेरीवाले : १८०

**शहरातील मालमत्ता**
निवासी : ५,०७,२५४
बिगरनिवासी : ५३, ७४४
**औद्योगिक : ३,०५८**
मोकळ्या जमिनी : १०,२५९
मिश्र : १५,९११
इतर : १,७६९
एकूण : ५,९३,८०५

**कचरा संकलन वाहने : ४२१**
प्रतिदिन कचरा निर्मिती : ११०० टन
शहराची लोकसंख्या : २७ लाख

# चिंचवड पोटनिवडणूकः ४० उमेदवार रिंगणात!

## » सात उमेदवारांचे अर्ज बादः भाजपच्या अश्विनी जगताप, महाविकास आघाडीचे नाना काटे, अपक्ष राहुल कलाटे यांचा अर्ज वैध

।पिंपरी चिंचवड।
।महाईन्यूज।प्रतिनिधी।

**चिंचवड विधानसभा मतदारसंघ पोटनिवडणुक २०२३ च्या अनुषंगाने थेरगाव येथील निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयामध्ये मुदतीत ४० उमेदवारांनी ५३ नामनिर्देशन पत्र दाखल केले होते. यापैकी ३३ उमेदवारांचे नामनिर्देशन वैध ठरले असून ७ उमेदवारांचे नामनिर्देशन अवैध ठरले आहे. तर ५३ नामनिर्देशनपत्रा पैकी ४० नामनिर्देशन पत्रे वैध ठरली असून १३ नामनिर्देशन पत्रे अवैध ठरली आहेत.**





भाजपचे उमेदवार शंकर पांडुरंग जगताप यांचा मुख्य उमेदवार पात्र असल्यामुळे त्यांचा बदली उमेदवारी अर्ज रद्द करण्यात आला आहे. तसेच आम आदमी पक्षाचे मनोहर पाटील यांचा अर्ज नामनिर्देशन पत्र अपूर्ण तसेच B फॉर्म अपूर्ण असल्यामुळे रद्द झाला आहे. यासह चेतन मछिंद्र ढोरे, गणेश सुरेश जोशी, उमेश महादेव म्हेत्रे, प्रकाश रामचंद्र बालवडकर, संजय भिकाजी मागाडे या पाच अपक्षांचे अर्जही बाद झाले आहेत. त्यामुळे आता भाजप आणि महाविकास आघाडी या मुख्य पक्षांच्या उमेदवारांसह तब्बल ३३ उमेदवार पोटनिवडणुकीच्या रिंगणात असणार आहेत. शुक्रवार (दि. १०) पर्यंत अर्ज माघारी घेता येणार आहेत. त्यानंतर खरी लढत स्पष्ट होणार आहे. २६ फेब्रुवारीला पोटनिवडणुकीसाठी मतदान होणार असून २ मार्चला निकाल जाहीर होणार आहे.

चिंचवड विधानसभा मतदारसंघ पोटनिवडणुक २०२३ च्या अनुषंगाने दाखल झालेल्या नामनिर्देशन पत्रांची आज छाननी प्रक्रिया सुरळीतपणे पार पडली. निवडणूक निर्णय अधिकारी सचिन ढोले यांनी यावेळी वैध आणि अवैध ठरलेल्या नामनिर्देशन पत्रांची घोषणा केली. चिंचवड विधानसभा मतदारसंघ पोटनिवडणुक २०२३ साठी नियुक्त करण्यात आलेले निवडणूक निरीक्षक एस. सत्यनारायण आणि निवडणुक पोलीस निरीक्षक अनिल किशोर यादव यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडलेल्या या छाननी प्रक्रियेवेळी नामनिर्देशन पत्रे दाखल करणारे उमेदवार आणि त्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

### उमेदवारांची रचना

» एकूण उमेदवार-४०
एकूण नामनिर्देशन पत्रे – ५३
पैकी वैध उमेदवार- ३३
वैध नामनिर्देशन पत्रे – ४०
पैकी अवैध उमेदवार- ०७
अवैध नामनिर्देशन पत्रे – १३
३३ उमेदवारांपैकी राष्ट्रीयकृत पक्षांच्या उमेदवारांची संख्या – २,
नोंदणीकृत पक्षांचे उमेदवार- ५
अपक्ष उमेदवार – २६

# मविआला बंडखोरांची डोकेदुखी!

## » कसबा, चिंचवड पोटनिवडणुकीत आव्हान

।पुणे ।महाईन्यूज। प्रतिनिधी।

**कसबा पेठ; तसेच चिंचवड विधानसभेच्या पोटनिवडणुकीत अनुक्रमे २९ आणि ४० उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत. दोन्हीही मतदारसंघात महाविकास आघाडीच्या बंडखोरांनी दंड थोपटल्याने त्यांची बंडखोरी रोखण्याचे आव्हान उभे राहिले आहे. कसब्यात बाळासाहेब दाभेकर, तर चिंचवडमध्ये राहुल कलाटे यांची उमेदवारी महाविकास आघाडीसाठी डोकेदुखी ठरण्याची चिन्हे आहेत.**



चिंचवड विधानसभा पोटनिवडणुकीसाठी महाविकास आघाडीकडून राष्ट्रवादी काँग्रेसचे नाना काटे यांचा अर्ज भरण्यात आला आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे राहुल कलाटे हे या ठिकाणाहून लढण्यासाठी इच्छुक होते. गेल्या निवडणुकीत त्यांनी दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांच्यासमोर आव्हान उभे केले होते. त्यामुळे पोटनिवडणुकीची उमेदवारी मिळेल, अशी त्यांना अपेक्षा होती. मात्र, राष्ट्रवादी काँग्रेसने काटे यांना उमेदवारी दिल्याने कलाटे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. कलाटे यांची बंडखोरी काटे यांच्यासमोर डोकेदुखी ठरणारी आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे मावळचे आमदार सुनील शेळके यांनी कलाटे यांची भेट घेऊन त्यांची बंडखोरी थांबविण्याचा प्रयत्न केला. मात्र, कलाटे यांनी अर्ज भरला आहे. हा अर्ज त्यांनी मागे घेतला नाही तर महाविकास आघाडीच्या मतांमध्ये मोठी फूट अपेक्षित असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे.

**'बिनविरोध'साठी प्रयत्न**

कसबा; पेठ तसेच चिंचवड विधानसभा मतदारसंघाची निवडणूक बिनविरोध करण्यासाठी भाजपकडून प्रयत्न सुरू आहेत. 'कसब्या'ची निवडणूक बिनविरोध होण्याची शक्यता कमी आहे. चिंचवडमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसकडून बिनविरोधसाठी तयारी दर्शवली गेली, तर तसे होऊ नये, यासाठी राहुल कलाटे यांचा अपक्ष अर्ज महत्त्वाची भूमिका बजावू शकतो. शिवसेनेकडून ठाकरे त्यासाठी ही खेळी खेळली गेल्याची दबक्या आवाजात चर्चा आहे.

**मोहोळ भाजपचे प्रभारी**

भारतीय जनता पक्षाने कसबा पेठ आणि चिंचवड विधानसभेच्या पोटनिवडणुकीसाठी प्रभारी म्हणून प्रदेश सरचिटणीस मुरलीधर मोहोळ यांची नियुक्ती केली आहे. कसब्यासाठी निवडणूक प्रमुख आमदार माधुरी मिसाळ, सहप्रमुख धीरज घाटे आणि चिंचवडसाठी निवडणूक प्रमुख शंकर जगताप यांची नियुक्ती केली आहे. भाजपकडून पक्षांतर्गत नाराजी दूर करण्यासाठी तातडीने पावले उचलण्यात येत असल्याचे चित्र गेल्या दोन दिवसांपासून दिसत आहे.

### दाभेकरांनी दंड थोपटले

**» कसबा पेठ विधानसभा पोटनिवडणुकीसाठी महाविकास आघाडीकडून रवीद्र धंगेकर यांनी उमेदवारी अर्ज भरल्यामुळे काँग्रेसचे नेते बाळासाहेब दाभेकर यांनी बंडखोरी करत आपला अर्ज दाखल केला आहे. नारायण पेठेतील मोदी गणपतीपासून दुचाकींच्या रॅलीद्वारे ग्रामदेवता कसबा, दगडूशेठ गणपतीचे दर्शन घेतल्यानंतर त्यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. दाभेकर यांची उमेदवारी महाविकास आघाडीला काही अंशी त्रासदायक ठरू शकते. काँग्रेसला या ठिकाणी मिळणारी काही मते दाभेकर यांच्याकडे विभागली जाण्याची दाट शक्यता आहे. कसबा पेठ विधानसभा मतदारसंघ शिवाजी रस्त्याच्या दोन्ही बाजूला विभागला गेला आहे. पूर्व आणि पश्चिम अशा विभागणीत पूर्व भागाने काँग्रेसला कायम सहकार्य केले आहे. मतांमध्ये विभागणी झाली, तर त्याचा फटका काँग्रेसला बसू शकतो. कसब्यात तिरंगी लढत झाल्यास त्याचा फायदा कायम भाजपला झाला आहे. त्यामुळे दाभेकरांची उमेदवारी काँग्रेसच्या उमेदवारासाठी डोकेदुखी ठरण्याची दाट शक्यता आहे.**

---

# काँग्रेसमधील वादावर सुधीर मुनगंटीवारांची टोलेबाजी

## » बाळासाहेब थोरातांना दिलीभाजप प्रवेशाची ऑफर

।पुणे ।महाईन्यूज। प्रतिनिधी।

नाशिक पदवीधर निवडणूक जिंकल्यानंतर सत्यजीत तांबेच्या एका पत्रकार परिषदेमुळे काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले चांगलेच अडचणीत सापडले आहेत.सत्यजित तांबे यांनी नाना पटोलेंनी चुकीचे एबी फॉर्म दिल्याचा आरोप केला. त्यानंतर माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी भूमिका मांडली. त्यानंतर थोरात यांनी विधिमंडळ पक्षनेते पदाचा राजीनामा दिल्याचा बातम्या आल्या. या प्रकरणानंतर काँग्रेस मध्ये नाना पटोले आणि बाळासाहेब थोरात यांच्यातील वाद समोर आला आहे. मात्र, या वादात तेल ओतण्याचे काम राज्याचे वन मंत्री व भाजपचे नेते सुधीर मुनगंटीवार यांनी केलं आहे. पुण्यातील वनभवन येथे सांस्कृतिक मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती.यावेळी ते बोलत होते. सुधीर मुनगंटीवार यांनी बाळासाहेब थोरात भाजपमध्ये आले तर स्वागतच आहे. मात्र, ते पक्षात येतील असं वाटत नसल्याचं म्हटलं. कसबा पेठ मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीसंदर्भात माझे जवळचे मित्र गणेश बिडकर आणि धीरज घाटे यांना उमेदवारी दिली नाही म्हणून नाराज न होता ते दोन्ही कार्यकर्ते निवडणुकीसाठी जीव ओतून काम करत आहेत. मला अशा पक्षाचा अभिमान आहे. जिथे नाना पटोले आणि बाळासाहेब थोरातांसारखी वर्तणूक होत नाही, असं म्हणत मुनगंटीवार यांनी काँग्रेसला चिमटा काढला.



### बाळासाहेब थोरात हातात भाजपचा झेंडा घेतील का ?

» बाळासाहेब थोरात यांनी भाजपचा झेंडा हाती घेतला तर काही हरकत नाही. पण, बाळासाहेब थोरात भाजपचा झेंडा हातात घेतील का ? मात्र, हातात झेंडा घेतला तर स्वागत पण एवढे वर्ष काँग्रेससाठी काम करून निवडून येणारे भाजपचा झेंडा हाती घेतील, असं वाटत नसल्याचं मुनगंटीवार म्हणाले.

सुधीर मुनगंटीवार म्हणाले की, मला या कार्यकर्त्यांचा अभिमान वाटतो माझ्यासाठी हा आनंदाचं क्षण आहे. माझ्या सारख्या कार्यकर्त्याला असंच वाटत की ,या जन्मी मला भाजपचा झेंडा हाती दिला देवा मला पुढच्या जन्म द्यायचा असेल तर हाती भाजपचाच झेंडा दे. जिथे एवढे प्रेमळ कार्यकर्ते आहे, त्यांना तिकीट दिली नाही तर तसुभर ही अन्यायाची भावना व्यक्त करत नाहीत, असं मुनगंटीवार म्हणाले. कसबा पोटनिवडणूक बिनविरोध करण्यासंदर्भात भाजपचे प्रयत्न अजून सुरू आहेत का ? असा प्रश्न त्याना विचारला असता मुनगंटीवार म्हणाले की, पोटनिवडणुकीत अशी गरज नाही आहे की त्या घरातच उमेदवारी दिली पाहिजे. ज्यांना उभे राहायचे त्यांना उभा राहू द्या. आम्ही निवडणुका लढवण्यासाठी तयार आहोत ,पण जनतेने या महाविकास आघाडीचं मायावीरुप समजून घेतलं पाहिजे, असं सुधीर मुनगंटीवार म्हणाले.

## कसब्यातून उमेदवारी हुकलेल्या भाजप नेत्याची फडणवीसांकडून समजूत

।पुणे ।महाईन्यूज।



गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्राच्या सत्ताकारणाचे केंद्र ठरत असलेल्या कसबा विधानसभा मतदारसंघाची पोटनिवडणूक सध्या अनेक कारणांनी गाजत आहे. या पोटनिवडणुकीत टिळक घराण्यातील व्यक्तीला संधी न मिळाल्यामुळे कसब्यातील ब्राह्मण समाज भाजपवर प्रचंड नाराज झाल्याची चर्चा होती. हेमंत रासने यांना उमेदवारी मिळाल्यामुळे भाजपमधील अन्य इच्छूक उमेदवारही नाखूश होते. यामध्ये धीरज घाटे यांच्या नाराजीचा मुद्दा चर्चेचा विषय ठरला होता. परंतु उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आणि पुण्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी धीरज घाटे यांनी समजूत काढून या वादावर पडदा टाकला. देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी धीरज घाटे यांना मुंबईला बोलावून घेतले होते. सह्याद्री अतिथीगृहावर या दोन्ही नेत्यांची भेट झाली. यावेळी फडणवीसांनी शेजारी बसवून धीरज घाटे यांची समजूत काढली. 'धीरज तुझं काय आता वय झालं का.. तुला आणखी भरपूर संधी आहे', असे फडणवीस यांनी म्हटले. यानंतर धीरज घाटे यांनी हेमंत रासने यांच्या विजयासाठी सर्वशक्तिनिशी प्रयत्न करू असा शब्द देवेंद्र फडणवीस यांना दिला. गेल्या काही वर्षांपासून धीरज घाटे यांच्याकडून कसबा विधानसभा मतदारसंघात आपली प्रतिमानिर्मिती केली जात होती. भाजपमध्ये अनेक संघटनात्मक पदांवर काम करताना घाटे यांनी आपली छाप उमटवली होती. त्यामुळे कसब्याचा पुढचा आमदार म्हणून धीरज घाटे यांच्या नावाची कायम चर्चा असायची. त्यामुळे साहजिकच पोटनिवडणुकीत पक्ष आपल्याला संधी देईल, अशी धीरज घाटे यांची अपेक्षा होती. परंतु, हेमंत रासने यांना उमेदवारी मिळाल्याने धीरज घाटे यांचा भ्रमनिरास झाला होता. यानंतर धीरज घाटे यांची भावजय आणि माजी नगरसेविका मनीषा घाटे यांनीही सोशल मीडियावरुन जाहीरपणे नाराजी व्यक्त केली होती. मात्र, भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी धीरज घाटे यांच्या घरी जाऊन त्यांची समजूत काढली होती. यानंतर धीरज घाटे यांची नाराजी दूर झाली होती.

# औद्योगिक पट्ट्यातील सांडपाणी प्रश्न सुटला!

## उद्योगमंत्री उदय सामंत यांनी शब्द पाळला, आमदार महेश लांडगे यांचा यशस्वी पाठपुरावा

। पिंपरी ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवडमधील औद्योगिक पट्ट्यात निर्माण होणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी यंत्रणा उभारवी, अशी गेल्या अनेक वर्षांपासून मागणी होती. पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनामार्फे अखेर "कॉमन एफ्लुएंट ट्रीटमेंट प्लांट" (सीईटीपी) उभारण्याचे काम सुरू झाले.**

पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनातर्फे सीईटीपीच्या कामाचे बुधवारी भूमिपूजन करण्यात आले. यावेळी पर्यावरण विभागाचे सह शहर अभियंता संजय कुलकर्णी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रादेशिक अधिकारी शंकर वाघमारे, सहाय्यक प्रादेशिक अधिकारी किरण हसबनिस, एमआयडीसीचे कार्यकारी अभियंता एम एस कलकूटकी, एमसीसीआयएचे अध्यक्ष दीपक करंदीकर, एमसीसीआयएचे महासंचालक प्रशांत गिरबाने, पुणे मेटल फिनिशर्स असोसिएशनचे अध्यक्ष सतीश बनवट,पीसीएमसी सीईटीपी फाउंडेशनचे अध्यक्ष संजीव शहा, पालिका सहाय्यक आयुक्त अण्णा बोदडे यांच्यासह स्थानिक उद्योग संघटनांचे अधिकारी समारंभासाठी उपस्थित होते.

भोसरी एमआयडीसी येथील प्लॉट क्र. १८८/१ येथे या सीईटीपी प्रकल्पाचे भूमिपूजन करण्यात आले. पिंपरी-चिंचवडचा औद्योगिक पट्टा महाराष्ट्र आणि भारतातील एक प्रमुख उत्पादन केंद्र आहे. भोसरी, पिंपरी आणि चिंचवड एमआयडीसी आणि लगतच्या परिसरात ४ हजारहून अधिक लहान-मोठ्या कंपन्या या ठिकाणी कार्यरत आहेत. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून प्राप्त आकडेवारीनुसार सुमारे १ हजार औद्योगिक युनिट्स घातक सांडपाणी आणि कचरा निर्माण करतात. या युनिट्समध्ये धोकादायक सांडपाणी, कचऱ्याची कायदेशीर आणि पर्यावरणास अनुकूल पद्धतीने विल्हेवाट लावण्याची सुविधा नाही. या परिस्थितीमुळे माती आणि जल प्रदूषण होत आहे. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड ॲग्रिकल्चर पाठपुरावा करत असून, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे सीईटीपी मागणी करण्यात येत होती.



सीईटीपी उभारण्याच्या कामाचे भूमिपूजन

दरम्यान, राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराने इतिसात पहिल्यांदा लघु उद्योजकांच्या समस्यांबाबत संघटनेच्या प्रतिनिधींसोबत शहरात दोनवेळा उद्योगमंत्र्यांची बैठक झाली.

त्यानंतर मुंबईतही संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक घेण्यात आली. त्यावेळी विविध मागण्यांसह सीईटीपी उभारण्याचा प्रश्न मार्गी लावण्याबाबत उद्योगमंत्र्यांनी शब्द दिला होता. तो पूर्ण करीत उद्योजकांना दिलासा देण्याची भूमिका प्रशासनाने घेतली आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिका अंतर्गत येत असलेल्या एमआयडीसी भागात 'कॉमन इफ्लुएंट ट्रीटमेंट प्लांट' उभारण्यासाठी १.५ एकरचा भूखंड (प्लॉट क्र. टी-188/1, एमआयडीसी, भोसरी) नाममात्र दराने उपलब्ध करून देण्यात आला असून, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने रेड आणि ऑरेंज श्रेणीतील औद्योगिक युनिट्सचा संमती डेटा प्रदान केला आहे, अशी माहिती महापालिका पर्यावरण विभागाचे सह शहर अभियंता संजय कुलकर्णी यांनी दिली.

> **सदर प्रकल्पाचा डीपीआर तयार करण्याचे काम जानेवारी २०२३ मध्ये सुरू झाले असून, ३ ते ४ महिन्यांत पूर्ण करण्यात येणार आहे. सांडपाणी निर्मितीचे प्रमाण लक्षात घेता सुमारे १ दशलक्ष क्षमतेच्या प्रकल्पाची आवश्यकता आहे. तथापि, तपशीलवार प्रकल्प अहवाल तयार झाल्यानंतर अंतिम क्षमतेचा निर्णय घेण्यात येणार आहे. सीईपीटी एकदा कार्यान्वित झाल्यानंतर माती आणि नदीचे प्रदूषण कमी करण्यास मदत होणार आहे.**
> **- संजय कुलकर्णी, सह शहर अभियंता, पर्यावरण विभाग.**

---

# सामाईक औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाचे भूमिपूजन

## पिंपरी चिंचवड महापालिकेचे विविध विभागाचे अधिकाऱ्यांची उपस्थिति

।पिंपरी चिंचवड ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, एमआयडीसी,पीसीएमसी सीईटीपी फौंडेशन, एमपीसीबी यांच्या संयुक्त विद्यमाने आणि मराठा चेंबर ऑफ़ कॉमर्सच्या विशेष सहकार्याने भोसरी येथे उभारण्यात येत असलेल्या सामाईक औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाचे(सीईटीपी) आज भूमिपूजन करण्यात आले.**

यावेळी पिंपरी चिंचवड महापालिकेचे पर्यावरण विभागाचे सह शहर अभियंता संजय कुलकर्णी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रादेशिक अधिकारी शंकर वाघमारे, सहाय्यक प्रादेशिक अधिकारी किरण हसबनिस, एमआयडीसीचे कार्यकारी अभियंता एम एस कलकूटकी , एमसीसीआयएचे अध्यक्ष दीपक करंदीकर , एमसीसीआयए चे महासंचालक प्रशांत गिरबाने , पुणे मेटल फिनिशर्स असोसिएशन चे अध्यक्ष सतीश बनवट, पीसीएमसी सीईटीपी फाउंडेशनचे अध्यक्ष संजीव शहा, पालिका सहाय्यक आयुक्त अण्णा बोदडे स्थानिक उद्योग संघटनांचे अधिकारी समारंभासाठी उपस्थित होते.

पिंपरी चिंचवड हा औद्योगिक पट्टा महाराष्ट्र आणि भारतातील एक प्रमुख उत्पादन केंद्र आहे. भोसरी, पिंपरी आणि चिंचवड एमआयडीसी आणि लगतच्या परिसरात ४ हजारहून अधिक लहान-मोठ्या कंपन्या आहेत.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून प्राप्त आकडेवारीनुसार सुमारे १ हजार कंपन्यांमधील रासायनिक घातक सांडपाणी आणि कचरा निर्माण होतो. या कंपन्यांचे रसायन मिश्रीत सांडपाणी, कचऱ्याची कायदेशीर



आणि पर्यावरणास अनुकूल पद्धतीने विल्हेवाट लावण्याची सुविधा नाही. या परिस्थितीमुळे जमीन आणि जल प्रदूषण होत आहे. मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड ॲग्रिकल्चर (MCCIA) गेल्या काही दशकांपासून पाठपुरावा करत असून सामाईक औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (CETP) स्थापनेबाबतची मागणी करण्यात येत होती.

यावेळी मराठा चेंबर ऑफ़ कॉमर्सचे अध्यक्ष दीपक करंदीकर म्हणाले कि, औद्योगिक क्षेत्राची गरज लक्षात घेऊन गेल्या वर्षी पिंपरी चिंचवड महानगरपालिका, एमआयडीसी, एमपीसीबी (MPCB) आणि उद्योग संघटना यांची बैठक घेण्यात आली होती.

यामध्ये, PCMC अंतर्गत येत असलेल्या MIDC भागात कॉमन इफ्लुएंट ट्रीटमेंट प्लांट (CETP) स्थापन करण्याबाबत निर्णय घेण्यात आला.

त्यानुसार, एमआयडीसी कडून सुमारे 1.5 एकरचा भूखंड (प्लॉट क्र. T-188/1, MIDC, भोसरी) नाममात्र दराने उपलब्ध करून देण्यात आला असून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने रेड आणि ऑरेंज श्रेणीतील औद्योगिक युनिट्सचा संमती डेटा प्रदान केला आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार मिलिंद वराडकर यांनी मानले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पराग कुलकर्णी, विवेक राऊत, संदीप हातकर यांनी विशेष परिश्रम घेतले.

> **प्रकल्पाचा DPR तयार करण्याचे काम जानेवारी 2023 मध्ये सुरू झाले असून 3 ते 4 महिन्यांत पूर्ण होईल. सांडपाणी निर्मितीचे प्रमाण लक्षात घेता सुमारे 1 MLD च्या प्लांटची आवश्यकता यासाठी आहे. तथापि, तपशीलवार प्रकल्प अहवाल तयार झाल्यानंतर अंतिम क्षमतेचा निर्णय घेण्यात येईल. यासाठी पिंपरी चिंचवड महापालिका एकूण प्रकल्प खर्चाच्या ६५ % भार उचलणार असून एमआयडीसी आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ प्रकल्प खर्चामध्ये अनुक्रमे २० % आणि 5% योगदान देतील. तसेच, उद्योजक खर्चाच्या उर्वरित १०% वाटा उचलणार आहे. औद्योगिक कंपन्यांमधून टँकरमध्ये सांडपाणी संकलित केले जाईल. सांडपाणी निर्माण करणाऱ्या कंपन्यांना CETP चे सदस्य होणे बंधनकारण असणार आहे. मराठा चेंबर ऑफ़ कॉमर्स हे CETP स्थापन करण्यासाठी महत्त्वपूर्ण आणि रचनात्मक सहाय्य करीत आहे. हा प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर जमीन आणि नदीचे प्रदूषण कमी होण्यास मदत होणार आहे.**
> **- संजीव शहा,**
> **पीसीएमसी सीईटीपी फाउंडेशनचे अध्यक्ष**

## संपादकीय »

# छमछम...धोक्याची घंटा वाजतेय!

***नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत, तसेच डोंबिवलीच्या पट्ट्यात लेडीज बार, तसेच डान्स बारचे पेव मोठ्या प्रमाणात फुटले आहे. अशी विरंगुळ्याची ठिकाणे असावी की नसावी, याबाबत दोन मतप्रवाह आहेत.***

अर्थात हा कळीचा मुद्दा असल्याने त्यावरील भाष्य येथे अप्रस्तुत ठरेल, मात्र या बारमधून जमणाऱ्या तरुणांच्या झुंडी लक्षात घेतल्या तर या तरुण पिढीच्या भावी आयुष्याची चिंता वाटल्यावाचून राहणार नाही. हातात नोटांची पुडकी घेऊन बारबालांवर त्याची उधळण करणारी तरुण पिढी बार संस्कृतीच्या पाशात गुरफटून गेलीत, किंबहुना त्यासाठी वेडी झाल्याचे म्हटले तर चुकीचे ठरणार नाही. बारमधून 'मनी शो' होत असल्याने रायगड आणि ठाणे जिल्ह्यात फोफावलेल्या बार संस्कृतीला स्थानिक प्रशासनाचा मनापासून हातभार लागलेला आहे. त्यामुळे बारचे मालकही सुशेगात आहेत. त्यांना कुणाचे भय उरलेले नाही. रायगड जिल्ह्यात जमिनीला सोन्याचा भाव आल्यानंतर जमीन विकण्याकडे कल वाढला. सुपीक जमिनीही विकण्यात आल्या. गुलछबू प्रवृत्तीच्या तरुणांनी आलेला पैसा बारमध्ये उडविण्यास सुरुवात केली. मुंबईपुरती मर्यादित असलेली डान्स बार किंवा लेडीज बार संस्कृती नवी मुंबईकडे सरकली आणि असे आज शेकडो बार सुरू झाले आहेत. या बारमुळे परिसरातील आर्थिक व्यवस्थेला किती सुबत्ता आली हा संशोधनाचा विषय असला तरी या व्यवसायातून मूठभरांना रग्गड पैसा मिळू लागला आहे. त्यासाठी नियमांचे तीन तेरा वाजविण्यात आले असून पहाटेपर्यंत मद्य आणि मदिरेत अनेकजण गुरफटून गेलेले असतात. तरुणांचे वाढते बार प्रेम चिंता करायला लावणारे आहे. वडिलोपार्जित संपत्तीतून मिळालेला पैसा बारमधून सहजपणे उधळण्याच्या प्रवृत्तीला समाजधुरीणींचा विरोध आहे, तशी चिंताही ते वारंवार व्यक्त करीत आहेत. डान्स बार किंवा लेडीज बार चालू ठेवण्यासाठी निश्चित असे नियम आहेत. सर्वोच्च न्यायालयाने डान्स बार बंदी उठविल्यानंतर बार संस्कृती सुसाट झाली आहे. आता आपल्याला कसले भय उरलेले नाही या अविर्भावात बार चालक आहेत. हे चालक नियमांनाच आपल्या तालावर नाचवू लागले आहेत. कोणत्याही नियमाचे पालन होत नाही यावर अनेकांचा आक्षेप आहे. आर. आर. पाटील राज्याचे गृहमंत्री असताना त्यांनी बार संस्कृतीवर घाव घालण्याचे काम केले. तरुण पिढी व्यसनाधीन होऊन हाती असलेला पैसा अशा वाममार्गाने उडविण्याच्या प्रवृत्तीला त्यांनी जाहीर विरोध केला होता. यामुळे त्यांच्यावर हितसंबंधियांकडून टीका झाली, पण मागे हटण्याचा पळपुटेपणा न करता ते आपल्या मतावर ठाम राहिले.



## आनंदी सकाळ

# गुरुतत्त्व परावाणीच्या अतीत...

भागवत धर्माचे आधारस्तंभ असलेल्या नाथांच्या घराण्यात दत्तभक्ती होती. श्रीजनार्दन स्वामींनी एकनाथांच्या बालवयातच, प्रामाणिक सेवाभावावर प्रसन्न होऊन, दत्तात्रेयांचे तीन शिरे, सहा हात असे सगुण दर्शन घडविले. दत्तात्रेयांच्या सगुण रूपाकडे पाहून, या संप्रदायाला सगुण म्हणावे, की त्रिगुणात्मक त्रैमूर्ती दत्ताला निर्गुण म्हणावे? सत्व-रज-तम, उत्पत्ती-स्थिती-लय याला कारक असलेल्या ब्रह्मा, विष्णू, महेश या तिन्ही देवता दत्तावतारात एकरूप आहेत. या तीन देवता कार्यरूपाने सगुण आहेत व आश्चर्य असे, की दत्तरूपात हे त्रिगुण एकत्रित आहेत. ती त्रिगुणांची साम्यावस्था आहे, म्हणजे, जगताचे अस्तित्व नसलेली गुणातीत स्थिती. असा हा सगुण-निर्गुणाचा एकाच वेळी, एकाच रूपात दर्शन घडविणारा, स्मर्तृगामी दत्त सगुण-निर्गुणाचे मोठे विलक्षण रूप आहे. संत एकनाथ म्हणतात, 'नेति नेति शब्द न ये अनुमाना।' कार्य व कारण या शब्दांनीही दत्तात्रेयांचे अनुमान करता येत नाही.

# महाराष्ट्राचा शैक्षणीक टक्का घसरता




उच्च शिक्षण संस्थांबाबत केंद्रीय शिक्षण मंत्रालयाकडून जाहीर करण्यात आलेल्या राष्ट्रीय संस्थात्मक क्रमवारीत (एनआयआरएफ) महाराष्ट्राच्या समोर आरसा धरला आहे

उच्च शिक्षण संस्थांबाबत केंद्रीय शिक्षण मंत्रालयाकडून जाहीर करण्यात आलेल्या राष्ट्रीय संस्थात्मक क्रमवारीत (एनआयआरएफ) महाराष्ट्राच्या समोर आरसा धरला आहे. शिक्षणात महाराष्ट्र अग्रेसर असल्याचा, पुणे हे शिक्षणाचे माहेरघर असल्याचा अभिमान गळून पडावा, अशी राज्याची स्थिती आहे.

देशातील उच्च शिक्षण संस्थांबाबत केंद्रीय शिक्षण मंत्रालयाकडून जाहीर



करण्यात आलेल्या राष्ट्रीय संस्थात्मक क्रमवारी (एनआयआरएफ) पाहिल्यानंतर महाराष्ट्राने अंतर्मुख होण्याची गरज आहे. शिक्षणात महाराष्ट्र अग्रेसर असल्याचा; तसेच पुणे हे शिक्षणाचे माहेरघर असल्याचा अभिमान गळून पडावा, यापुढे कितपत बाळगावा असा प्रश्नही यामुळे उपस्थित होतो. 'एनआयआरएफ'च्या सर्व याद्यांवर नजर टाकल्यानंतर काही गोष्टी प्रकर्षाने जाणवतात. पहिली : तमिळनाडूने घेतलेली आघाडी. दुसरी : काही केंद्रीय आणि राज्यस्तरीय प्रतिष्ठित संस्था वगळता बहुतेक विद्यापीठे आणि महाविद्यालये खासगी आहेत. तिसरी : महाराष्ट्रातील पुणे, मुंबई आणि नागपूर वगळता अन्य शहरांतील संस्था वेगवेगळ्या याद्यांत अपवादानेच आढळतात. चौथी : इंडियन इन्स्टिट्यूट्स ऑफ टेक्नॉलॉजी (आयआयटी) किंवा साधनांबाबत अजिबात कमतरता नसलेल्या खासगी संस्था आणि सरकारी विद्यापीठे व महाविद्यालये यांच्यात दिवसागणिक विषम होत चाललेली स्पर्धा.

राष्ट्रीय स्तरावरून क्रमवारी जाहीर करण्याचा गेल्या काही वर्षांपासून सुरू असलेल्या या उपक्रमामुळे देशातील उच्च शिक्षणाची गुणवत्ता उंचावण्यात कितपत मदत होते हे स्पष्ट करणारी आकडेवारी उपलब्ध नाही; परंतु क्रमवारीच्या याद्यांत स्थान मिळविण्यासाठी उच्च शिक्षण संस्थांना प्रेरणा मिळत असावी. अध्यापन-अध्ययनासाठीची साधनसामग्री, संशोधन, शिक्षण घेऊन बाहेर पडणाऱ्या पदवीधरांची स्थिती, बहि:शाल शिक्षण आणि सर्वसमावेशकता, आणि संबंधित संस्थांबद्दलचे शैक्षणिक क्षेत्रातील एकूण मत या पाच निकषांची पूर्तता उत्तम प्रकारे करणाऱ्या संस्थांना क्रमवारीत स्थान मिळते. ही पूर्तता करण्यासाठी विद्यार्थ्यांच्या तुलनेत पुरेसे शिक्षक असण्याची आवश्यकता असते; तसेच पुरेसा निधीही उपलब्ध होणे गरजेचे असते. विशेषत: राज्य सरकारच्या अखत्यारितील बहुतेक विद्यापीठांमध्ये शिक्षकांची पदे रिक्त राहण्याचे प्रमाण अधिक आहे. त्यांना मिळणारा निधीही अपुरा आहे.

# हायस्पीड विकासाची नांदी!

**पुणे-नाशिक यांना जोडणारा २३५ किलोमीटर अंतराचा हायस्पीड रेल्वे प्रकल्प उभारला जाणार आहे. पुणे, नगर आणि नाशिक या तीन जिल्ह्यांतून लोहमार्ग उभारला जाणार असून, त्यावर २४ स्थानके प्रस्तावित आहेत.**

सुरुवातीला ही रेल्वे ताशी दोनशे किलोमीटर वेगाने धावू शकणार असल्याने सध्याचा सहा-सात तासांचा हा प्रवास अवघ्या पावणेदोन तासांत करता येईल. सुमारे १६ हजार कोटींचा खर्च अपेक्षित असलेला अन् देशातील सर्वांत कमी खर्चाचा हायस्पीड रेल्वे प्रकल्प म्हणून तो ओळखला जाणार आहे. राज्य सरकारने २० टक्के हिश्श्यापोटी प्रारंभीच्या ३२ कोटींच्या निधीला मंजुरी देऊन वितरणही सुरू केले आहे. पुणे जिल्ह्यात सर्वाधिक भूसंपादन झाले असून, तुलनेने इतर दोन जिल्ह्यांत प्रक्रिया संथ गतीने सुरू आहे.

### विकासाचा नवा आयाम

हा मार्ग पूर्णत्वास गेल्यास पुणे आणि नाशिक या ऐतिहासिक-धार्मिकदृष्ट्या 'सिस्टर सिटीज' अधिक जवळ येऊन दोन्ही शहरांतील ऋणानुबंध घट्ट होऊ शकतील. अवघ्या पावणेदोन तासांत दोन्ही शहरांत पोहोचणे शक्य होणार असल्याने रोजगार, विकासाच्या नव्या संधी उपलब्ध होतील. मध्यात या दोन्ही शहरांशी नाळ टिकवून असलेला नगर जिल्हा असल्याने तेथील शेती, उद्योगांनाही बळ मिळू शकेल. शेतकरी,



उद्योजक, छोटे-मोठे व्यावसायिक, सामान्य प्रवासी असे सारेच घटक लाभार्थी ठरतील. ऑटो हब ही पुण्याची ओळख अधिक घट्ट होऊन नाशिक-नगरच्या विकासाला नवा आयाम मिळेल. पुण्यापाठोपाठ एज्युकेशन हबच्या दिशेने मार्गक्रमण करणाऱ्या नाशिकची आणखी भरभराट होईल. मुंबई-पुणे-नाशिक हा सुवर्ण त्रिकोण खऱ्या अर्थाने सुफळ संपन्न होऊन नागरिकांचे जीवनमान उंचावण्यास मदत होईल.

### औद्योगिक कॉरिडोरचे काय?

पुणे-नाशिक सेमी हायस्पीड रेल्वे मार्गाला समांतर औद्योगिक कॉरिडोर करण्याचा राज्य सरकारचा प्रस्ताव आहे. हा कॉरिडोर पुढे नेला जाईल की तो गुंडाळला जाईल, हे अद्याप गुलदस्त्यात आहे. रेल्वेमंत्र्यांनी काही महिन्यांपूर्वी झालेल्या बैठकीत प्रकल्पाच्या सुरक्षिततेवर प्रश्न उपस्थित करतानाच 'रेल कम रोड' करण्याची सूचना केल्याने मूळ प्रस्तावित रेल्वे प्रकल्प आणखी लांबण्याची भीती व्यक्त होत होती. परंतु, आता महारेल कंपनी आणि रेल्वे अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक बोलावत तांत्रिक मुद्द्यांवर एकमत घडविण्याचे आश्वासन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले असल्याने या रेल्वेमार्गासाठी राज्य सरकार वेगाने पाठपुरावा करेल आणि अल्पावधीत मुंबई-नागपूर समृद्धी महामार्गापाठोपाठ आणखी एक सुपरफास्ट मार्ग राज्याच्या विकासात भर घालू शकेल.

### आक्षेपांची जंत्री

ब्रॉडगेजवर आधारित हा लोहमार्ग असणार का, संपूर्ण प्रकल्पाला मंजुरी मिळाली, की त्यात तांत्रिक बदल केले गेले? तांत्रिक अडथळ्यांशी सामना करताना आणखी वेळ दवडला जाणार का, प्रकल्प कालमर्यादित पूर्णत्वास येईल का, असे काही प्रश्न अद्याप अनुत्तरित आहेत. भूसंपादनाचा तिढा, रूळ ओलांडणाऱ्या प्राण्यांच्या सुरक्षिततेसह पर्यावरणाची संभाव्य हानी, लष्करी हद्दीचा वाद यांसह नारायणगावजवळील जीएमआरटी (जायंट मीटरवेव्ह रेडिओ टेलिस्कोप) या जगविख्यात वेधशाळेचे अस्तित्व या रेल्वेमुळे धोक्यात येण्याचीही ओरड सुरू आहे.

## ।। अभंगवाणी ।।



निंदी कोणी मारी ।
वंदी कोणी पूजा करी ॥१॥
मज हें ही नाहीं तें ही नाहीं ।
वेगळा दोहीं पासुनी ॥ध्रु.॥
**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# आमदार अपात्रतेच्या आधी निर्णय नको!

## उद्धव ठाकरेंचे निवडणूक आयोगाला आवाहन

। मुंबई। महाईन्यूज ।

**शिवसेनेने दाखल केलेल्या १६ आमदारांच्या अपात्रतेच्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने आधी निर्णय घ्यावा. तोपर्यंत निवडणूक आयोगाने पक्ष आणि चिन्हाबाबत निर्णय घेऊ नये, असे आवाहन शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते उद्धव ठाकरे यांनी केले. शिवसेना ही एकच आहे, एकच होती आणि यापुढे एकच असणार आहे, असे स्पष्ट करताना ते १६ आमदार अपात्र ठरतील, असा विश्वास व्यक्त केला. गद्दारांनी शिवसेनेवर दावा करणे हे नीचपणाचे आणि विकृत कृत्य आहे, अशी जळजळीत टीकाही त्यांनी केली.**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेत बंड करून अभूतपूर्व फूट घडवून आणली. आता शिंदे यांनी शिवसेना पक्ष आणि सेनेच्या निवडणूक चिन्हावर दावा सांगितला आहे. यासंदर्भातील वाद भारत निवडणूक आयोगाकडे प्रलंबित आहे. या पार्श्वभूमीवर आज पत्रकार परिषदेत बोलताना ठाकरे यांनी निवडणूक आयोगाला लोकशाही वाचविण्याचे आवाहन केले.

कोणताही पक्ष जनतेच्या आधारावर स्थापन होतो. जर पक्ष फक्त निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींवर अवलंबून राहणार असेल, तर उद्या देशातले दोन-तीन नंबरचे उद्योगपती आमदार-खासदार फोडून देशाचे पंतप्रधान किंवा मुख्यमंत्री होऊ शकतात. त्याला गद्दारी म्हणतात. पक्ष दोन पातळीवर



असतो. एक वैधानिक म्हणजे विधिमंडळ आणि दुसरा संसदीय आणि त्यापलीकडचा मोठा पक्ष रस्त्यावरचा असतो, असे उद्धव ठाकरे म्हणाले.

आयोगाने सांगितल्यानुसार आमच्या पदाधिकाऱ्यांची शपथपत्र, सदस्यांचे अर्ज आम्ही सादर केले आहेत. निवडून आलेले खासदार किंवा आमदार म्हणजेच पक्ष हा गद्दार गटाचा दावा हास्यास्पद आहे. सदस्यसंख्येचे गठ्ठे बघून त्यांच्या तोंडचे पाणी पळाल्याने ते असे दावे करत आहेत. देशात लोकशाही आहे असे आपण जर मानतो, तर पक्षांतर्गत लोकशाहीसुद्धा आहे. त्यानुसारच आम्ही निवडणुका घेतो, असेही उद्धव ठाकरे म्हणाले.

पक्ष जर का बाहेर गेलेल्या लोकांमुळे संपणार असेल किंवा पैशांच्या जोरावर फोडणार असेल तर मग लोकशाहीला काय अर्थ राहतो? निवडणूक आयोग कोणत्याही क्षणी निकाल जाहीर केला. तो जर त्यांच्या बाजूने असेल आणि न्यायालयाने जर त्यांना अपात्र ठरवले तर काय करणार? असा सवालही ठाकरे यांनी केला.

शिवसेनेकडे घटना आहे. शिवसेनाप्रमुख पद होते. हे पद फक्त बाळासाहेब ठाकरेंनाच शोभून दिसते, त्यामुळे त्यांच्यानंतर आम्ही हा शब्द गोठवला. मी पक्ष प्रमुख म्हणून कारभार पाहतो आहे. शिवसेनेत

### मुख्यनेतापद घटनाबाह्य

**आमच्या घटनेते मुख्यनेता असे पदच नाही. शिवसेनाप्रमुख या पदानंतर शिवसेना पक्षप्रमुख हे पद आम्ही निर्माण केले. मुख्यनेता हे पद घटनाबाह्य आहे. ते पद विचारात घेतले जाऊ नये, असे आवाहनही ठाकरे यांनी यावेळी केले. शिवसेनेला घटना आहे, नेता आहे. त्या घटनेनुसार निवडणुका होतात. गेले काही वर्ष पक्षप्रमुख म्हणून मी शिवसेनेचे काम पाहत आहे. यावेळची निवडणूक २३ जानेवारीला होणे अपेक्षित होते. आम्ही निवडणूक आयोगाकडे अध्यक्ष निवडण्याची परवानगी द्या किंवा आहे तसे चालू ठेवा अशी मागणी केली आहे. त्यावर अजून उत्तर आले नाही. आयोग परवानगी देईल तेव्हा निवडणूक होईल, असेही उद्धव ठाकरे यांनी स्पष्ट केले.**

मुख्य नेता हे पद घटनाबाह्य आहे. गद्दारांनी आम्हाला आधी घटना मान्य नाही सांगितले आणि नंतर घटनेप्रमाणेच काही पदांची निर्मिती केली. विभागप्रमुख हे पद फक्त मुंबईसारख्या मोठ्या शहरांसाठी आहे. त्यांनी मात्र सरसकट विभागप्रमुख नेमल्याकडे ठाकरे यांनी लक्ष वेधले.

सर्वोच्च न्यायालयात १६ जण अपात्र ठरण्याची शक्यता दाट आहे. घटनातज्ज्ञांनी म्हटल्याप्रमाणे त्याचा निर्णय आधी लागावा अशी आमची इच्छा आहे. आयोगाने जे काही मागितले ते सगळे आम्ही आयोगाला पुरवले आहे. पण नंतर हे गद्दार गट सांगायला लागले की आमच्याकडे आमदार-खासदार जास्त आहे. एखाद्याला ओसरी राहायला दिली तर तो उद्या घरावर अधिकार सांगायला लागला असा तो प्रकार झाला, असा टोला ठाकरे यांनी लगावला.

# आप्पासाहेब धर्माधिकारी यांना 'महाराष्ट्र भूषण'!



।अलिबाग । महाईन्यूज ।

**निरुपणाच्या माध्यमातून समाजप्रबोधन करणाऱ्या डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी यांना यंदाचा महाराष्ट्र भूषण पुरस्कार राज्य सरकारने बुधवारी जाहीर केला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रेवदंडा येथे या पुरस्काराची घोषणा केली.**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे सचिनदादा धर्माधिकारी यांच्या मुलाच्या व्रतबंधन सोहळ्यासाठी रेवदंडा येथे आले होते. या सोहळ्यादरम्यान त्यांनी आप्पासाहेब धर्माधिकारी यांना यंदाचा महाराष्ट्र भूषण पुरस्कार जाहीर केला.

एकाच कुटुंबातील दोन व्यक्तींना हा पुरस्कार जाहीर होण्याची ही पहिलीच वेळ आहे. याआधी नानासाहेब धर्माधिकारी यांना २००८ मध्ये महाराष्ट्र भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. आता आप्पासाहेबांसाठी पुरस्काराची घोषणा होताच त्यांच्या अनुयायांनी रेवदंडा येथे फटाके फोडून जल्लोष केला. या पुरस्कारामुळे जाबाबदारी वाढली आहे, अशी प्रतिक्रिया यावेळी अप्पासाहेबांनी दिली, तर हा दुग्धशर्करा योग असल्याचे सचिनदादा धर्माधिकारी म्हणाले.

### आप्पासाहेबांचे सामाजिक कार्य

आप्पासाहेब धर्माधिकारी यांना समाजप्रबोधनाचे बाळकडू वडील नानासाहेब धर्माधिकारी यांच्याकडून मिळाले. समाजप्रबोधनाला मानवी उत्थानाची जोड देण्याचे काम त्यांनी केले. त्यासाठी नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान स्थापना केली. बाल संस्कारवर्ग, आरोग्य शिबीर, रक्तदान शिबीर, व्यसनमुक्ती, परिसर स्वच्छता, वृक्ष लागवड, पर्यावरण संवर्धन, विहिरी पुनर्भरण, शैक्षणिक साहित्य वाटप यासारखे उपक्रम त्यांनी हाती घेतली. त्यास श्री सदस्यांनी हातभार लावला.

> आप्पासाहेब धर्माधिकारी यांचे कार्य प्रेरणादायी आहे. गेली अनेक वर्षे व्यसनमुक्ती, अंधश्रध्दा निर्मूलन, वृक्षारोपण, पर्यावरण संवर्धन आणि स्वच्छता आदी क्षेत्रात त्यांचे काम अव्याहतपणे सुरु आहे. त्याची दखल घेऊन त्यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार जाहीर करण्यात आला असून, त्यामुळे या पुरस्काराची उंची आणखी वाढणार आहे.
>
> – एकनाथ शिंदे, मुख्यमंत्री

> सन २००८ मध्ये वडील नानासाहेब धर्माधिकारी यांना हा पुरस्कार जाहीर झाला होता. आता तो मलाही जाहीर झाल्याचा आनंद आहेच. पण, पुरस्कारांबरोबर जबाबदारीही येत असते. त्यामुळे नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या वतीने सुरु असलेले सामाजिक कार्य व्यापक प्रमाणात पुढे नेण्याचा आमचा प्रयत्न राहील.
>
> -आप्पासाहेब धर्माधिकारी, ज्येष्ठ निरुपणकार

# आदित्य ठाकरेंचे काम लोकांना बघवत नाही; अजित पवारांचा विरोधकांना टोला

। नाशिक । महाईन्यूज ।



'आदित्य ठाकरे महाराष्ट्रात फिरत आहेत. त्यांचे हे काम काही लोकांना बघवत नाही', अशा शब्दांत राज्याचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी सत्ताधाऱ्यांवर निशाणा साधला.

शिवसेनेचे युवा नेते आदित्य ठाकरे यांच्या ताफ्यावर औरंगाबाद इथे झालेल्या दगडफेकीचा विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी तीव्र शब्दांत निषेध केला आहे. "आदित्य ठाकरे हे त्यांच्या पद्धतीने चांगले काम करत आहेत. महाराष्ट्रात फिरत आहेत. त्यांचे हे काम काही लोकांना बघवत नाही. त्यामुळंच काही लोक अडवाअडवी आणि दगडफेकीसारखे प्रकार करत आहेत", असे अजित पवार म्हणाले.

"सत्ता मिळाल्यानंतर लोकांसाठी राबवायची असते. रडीचा डाव खेळायचा नसतो. सत्ताधारी असो किंवा विरोधक, लोकशाहीत असं कुणीही करू नये", अशी अपेक्षा अजित पवार यांनी व्यक्त केली.

त्याशिवाय, "आदित्य ठाकरे हे युवा नेतृत्व म्हणून वेगवेगळे दौरे काढत असून त्यांच्या दौऱ्याला चांगलाच प्रतिसाद मिळत आहे. आपण मोठा निर्णय घेतल्यानंतर बाकीच्यांना असा प्रतिसाद मिळणार नाही, असे काही लोकांना वाटले होते", असेही अजित पवार म्हणाले.

"कोकणातील उमेदवार म्हात्रे जे निवडून आले होते, ते भाजपाचे तिकीट मिळण्यापूर्वी शिवसेनेच्या शिक्षक संघटनेचे काम करत होते. उद्धव ठाकरे म्हात्रे यांना उमेदवारी देण्यासाठी प्रयत्न करत होते. परंतु, विद्यमान उमेदवार असल्यामुळे तिकीट त्यांना देता आले नाही", असेही पवार म्हणाले

# शेतकरी आंदोलनाचं लोण फ्रान्समध्ये!

## पॅरिसमध्ये दिल्लीप्रमाणं शेतकऱ्यांनी काढला ट्रॅक्टर मार्च

। पॅरिस। महाईन्यूज ।

**भारतात केंद्र सरकारनं लागू केलेल्या कृषी कायद्यांविरोधात शेतकरी आक्रमक झाले होते. शेतकऱ्यांनी कृषी कायद्यांविरोधात थेट दिल्लीत धडक दिली होती. शेतकऱ्यांनी दिल्लीत देखील ट्रॅक्टर मार्च काढला होता.**



भारतातील शेतकऱ्यांच्या आंदोलनाप्रमाणं फ्रान्समधील शेतकरी देखील सरकारी धोरणाविरोधात आंदोलन करत आहेत. हजारो शेतकऱ्यांनी फ्रान्सची राजधानी पॅरिसमध्ये ट्रॅक्टर मार्च काढला. फ्रान्समध्ये कीटकनाशक वापरावर बंदी घालण्यात आली असून त्या निर्णयाविरोधात शेतकऱ्यांनी आंदोलन केलं. कीटकनाशकांच्या वापरावरील निर्बंध आणि पर्यावरणीय नियमांमुळं यूरोपियन यूनियनमधील सर्वात मोठ्या कृषी उत्पादक क्षेत्राला धक्का पोहोचवला जात असल्याचं शेतकऱ्यांनी म्हटलं.

फ्रान्सनं बीट उत्पादक शेतकऱ्यांना यूरोपियन यूनियन कडून बंदी घालण्यात आलेली कीटकनाशक वापरण्याची परवानगी देण्यात आली होती. मात्र, त्यानंतर यूरोपियन यूनियनच्या न्यायालयानं तो निर्णय बदलला होता. विविध साधनांवर बंदी घालण्यात आल्यानं शेती उत्पादनात घट होत असल्याचं फ्रान्समधील शेतकरी संघटनांकडून सांगण्यात आलं आहे. एफएलएसईए शेतकरी संघटनेचे सरचिटणीस जेरेमी डेस्पेई यांनी रॉयटर्स या वृत्तसंस्थेला या संदर्भात माहिती दिली आहे.

फेन्सा आणि इतर शेतकरी संघटनांच्या शेतकऱ्यांनी एकत्र येत पॅरिसमध्ये मोर्चाचं आयोजन केलं होतं. या मोर्चात ५०० ट्रॅक्टर्स घेऊन २ हजार शेतकरी सहभागी झाले होते. पॅरिस विभागातील शेतकऱ्यांनी आंदोलनात सहभाग घेतला.

पॅरिसमध्ये शेतकऱ्यांचा मोठा ट्रॅक्टर मोर्चा दिसून आला. ट्रॅक्टरवर शेतकऱ्यांनी विविध प्रकारच्या घोषणा लिहिल्या होत्या. फ्रान्सचे राष्ट्रपती मॅक्रॉन हे शेती क्षेत्राला दिवाळखोरीत काढत असून तुमच्या शेतकऱ्यांना वाचवा, असं आवाहन करण्यात आलं. मध्य पॅरिस विभागातील शेतकरी फ्रान्सच्या कृषी मंत्रालयाजवळ जमले होते. पर्यावरणवादी कार्यकर्त्यांनी मात्र यूरोपियन यूनियनच्या कीटकनाशकांवर निर्बंध घालण्याच्या निर्णयाचं स्वागत केलं आहे. कीटकनाशकांमुळं माती आणि वन्यजीवांच्या जीवनावर परिणाम होत असल्याचं पर्यावरणवाद्यांनी म्हटलं आहे.फ्रान्सच्या कृषी मंत्र्यांनी बीट उत्पादक शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्याचं आश्वासन दिल्याचं शेतकऱ्यांनी सांगितलं आहे. शेतकऱ्यांनी या निर्णयामुळं समाधानी नसून २०२४ ते २०२५ दरम्यान काही तरी मार्ग काढला गेला पाहिजे, असं म्हटलं आहे.

### तुमच्या शेतकऱ्यांना वाचवा...

**फ्रान्स आणि इतर शेतकरी संघटनांच्या शेतकऱ्यांनी एकत्र येत पॅरिसमध्ये मोर्चाचं आयोजन केलं होतं. या मोर्चात ५०० ट्रॅक्टर्स घेऊन २ हजार शेतकरी सहभागी झाले होते. पॅरिस विभागातील शेतकऱ्यांनी आंदोलनात सहभाग घेतला. पॅरिसमध्ये शेतकऱ्यांचा मोठा ट्रॅक्टर मोर्चा दिसून आला. ट्रॅक्टरवर शेतकऱ्यांनी विविध प्रकारच्या घोषणा लिहिल्या होत्या. फ्रान्सचे राष्ट्रपती मॅक्रॉन हे शेती क्षेत्राला दिवाळखोरीत काढत असून तुमच्या शेतकऱ्यांना वाचवा, असं आवाहन करण्यात आलं. मध्य पॅरिस विभागातील शेतकरी फ्रान्सच्या कृषी मंत्रालयाजवळ जमले होते.**

# ...अखेर 'त्या' तृतीयपंथी जोडप्याला झाले बाळ

## जाहद गरदोर असण्यावर सर्वांनीच आश्चर्य व्यक्त केले

।केरळ। महाईन्यूज ।

केरळ येथील तृतीयपंथी जोडप्याला बाळ झाले आहे. काही दिवसांपूर्वी या जोडप्याचे गरोदर असल्याचे फोटो सोशल मिडियावर व्हायरल झाले होते. मार्चच्या पहिल्या आठवड्यात प्रसूती होणार असल्याचे सांगितले होते. मात्र बुधवारी प्रसूती झाली.



जाहद फाजिल व जिया पावल असे या तृतीयपंथी जोडप्याचे नाव आहे. यातील जाहद पुरुष तृतीयपंथीय वर्गात मोडतो तर जिया ही महिला तृतीयपंथी आहे. विशेष म्हणजे जाहद हा गरोदर होता. गरोदर अवस्थेतील जाहदचे फोटो सोशल मिडियावर व्हायरल झाले होते. त्यात जाहद व जिया दिसत होते. मात्र जाहद गरदोर असण्यावर सर्वांनीच आश्चर्य व्यक्त केले. तृतीयपंथीची ही भारतातील पहिलीच प्रसूती असल्याचे बोलले जात होते.

जाहदची प्रसूती झाल्यानंतर जियाने त्यांना सहकार्य करणाऱ्या सर्वांचे आभार मानले. जाहदचे गरोदरपणातील फोटो व्हायरल झाल्यानंतर अनेकांनी आमच्यावर टीका केली. तरीही आम्ही धैर्याने व संयमाने परिस्थितीला सामोरे गेलो. आज जाहदची प्रसूती झाली. ही प्रसूती म्हणजे टीका करणाऱ्यांना एक प्रकारचे उत्तरच मिळाले आहे, असे जियाने सांगितले.

केरळ येथील कोझीकोड मेडिकल महाविद्यालयाच्या डॉक्टरांच्या चूमने या तृतीयपंथी जोडप्यावर उपचार केले. गर्भधारणा करण्यात जाहदला काहीच अडचण आली नाही. त्यावेळी या दोघांचीही लिंग परिवर्तनची प्रक्रिया सुरु होती. हे दोघेही तीन वर्षांपासून एकत्र राहत आहेत. जिया मुलगा म्हणून जन्माला आली होती. तर जिहाद मुलगी म्हणून जन्माला आला होता. या दोघांनीही लिंग परिवर्तन करुन घेतले.

या दोघांचे लिंग परिवर्तन करताना जिहादचे स्तन काढण्यात आले. मात्र त्याच्या शरीराच्या इतर अवयवांमध्ये बदल करण्यात आला नाही.

# काँग्रेसच्या काळात दहशतवाद, हिंसाचार वाढला

## पंतप्रधान नरेंद्र मोदींचा हल्लाबोल

। भोपाळ । महाईन्यूज ।

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज लोकसभेत राष्ट्रपतींच्या अभिभाषणावर बोलताना काँग्रेसच्या कार्यपद्धतीवर टीका केली आहे. २००४ ते २०१४ या काँग्रेसच्या दहा वर्षांच्या काळात काश्मीरपासून ते कन्याकुमारीपर्यंत दहशतीचे वातावरण होते. संपूर्ण देशात हिंसाचार पसरला होता. तसेच काँग्रेसच्या काळात देशात दहशतवाद आणि हिंसाचारही वाढल्याचा हल्लाबोल पंतप्रधान नरेंद्र मोदींनी काँग्रेसवर केला.

दहा वर्षांच्या काळात भारताचा आवाज ऐकायला कुणीही तयार नव्हतं. पण त्यानंतर २०१४ पासून देशाचे सामर्थ्य वाढले आणि जगभरात देशाचे नाव उंचावले. विरोधकांच्या निराशेचे कारण म्हणजे देशाची क्षमता वाढत आहे. देशाचे सामर्थ्य वाढत आहे. २००४ ते १४ पर्यंत यांना मोठ्या प्रमाणात संधी होती. परंतु यूपीए सरकारने ही संधी हातातून



घालावली, असं नरेंद्र मोदी म्हणाले.

एलओसी आणि एलएसीवर सुरक्षा वाढवण्याची गरज होती. परंतु हे सरकार घोटाळ्यात त्रस्त होते. ज्या काळात तंत्रज्ञान क्षेत्रात वाढ होत होती. तेव्हा हे २ जी घोटाळ्यात अडकले होते. सिव्हिल न्युक्लिअर करार झाला होता. तेव्हा हे कॅश फॉर व्होटमध्ये अडकले होते. यांनीच हे खेळ सुरू ठेवले आणि देशाला अंधारात ठेवले, असं मोदी म्हणाले.

अनेकांनी आपली मते येथे मांडली. प्रत्येकाचं बोलणं ऐकताना हेही लक्षात येतं की कोणाकडे किती क्षमता आहे. ते किती समजूतदार आहेत आणि कोणाचा हेतू काय आहे. काही लोकांच्या भाषणानंतर इकोसिस्टम उसळत होती. समर्थक उड्या मारत होते, अशा शब्दांत नरेंद्र मोदी यांनी राहुल गांधींवर निशाणा साधला.

### 2014 पासून देशाचे सामर्थ्य वाढले

**दहा वर्षांच्या काळात भारताचा आवाज ऐकायला कुणीही तयार नव्हतं. पण त्यानंतर २०१४ पासून देशाचे सामर्थ्य वाढले आणि जगभरात देशाचे नाव उंचावले. विरोधकांच्या निराशेचे कारण म्हणजे देशाची क्षमता वाढत आहे. देशाचे सामर्थ्य वाढत आहे. २००४ ते १४ पर्यंत यांना मोठ्या प्रमाणात संधी होती. परंतु यूपीए सरकारने ही संधी हातातून घालावली, असं नरेंद्र मोदी म्हणाले.**

# जान्हवी कपूरला होतोय पश्चाताप?

गेल्या काही वर्षात बॉलिवूडमधील स्टारकिड्स हा एक चर्चेचा विषय बनला आहे. गेल्या काही वर्षात अनेक कलाकारांच्या मुलांनी मनोरंजन क्षेत्रात पाऊल टाकलं. यात काही जणांना यश आलं तर काहीजण अपयशी ठरताना दिसत आहेत. आई-वडिलांमुळे त्यांना चित्रपटांमध्ये काम करताना प्राधान्य दिलं जातं असं अनेकदा बोललं जातं. आता अभिनेत्री जानवी कपूरने याबद्दल मत व्यक्त केलं आहे.

श्रीदेवी आणि बोनी कपूर यांची मुलगी जान्हवी कपूर हिने 'धडक' या करण जोहर निर्मित चित्रपटातून मनोरंजन सृष्टीत पाऊल टाकलं. त्यानंतरही तिने 'गुंजन सॅक्सेना', 'रुही', 'गुड लक जेरी', 'मिली' अशा विविध चित्रपटातून कामं केली. परंतु तिचे हे सगळे चित्रपट बॉक्स ऑफिसवर फारशी चांगली कमाई करू शकले नाहीत. प्रमाणे तिच्या अभिनयावरूनही तिला अनेकदा टोल केलं जातं. याबाबत आपलं मत व्यक्त करत तिने स्टारकिड असल्याचा तिला फायदा नाही तर नुकसान झालं आहे असं म्हटलं आहे.नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत तिने तिच्या करिअरबद्दल भाष्य केलं. ती म्हणाली, "मी जेव्हा एखाद्या चित्रपटावर मेहनत घेत असते तेव्हा मला अनेक मानसिक त्रासातून जावं लागतं. कोणी माझ्या कामावर संशय घेतं, तर कोणी सोशल मीडियावर मला 'नेपोटिझम की बच्ची...' अशी कमेंट करतं. लोकांना असं वाटतं की मला सगळं सहज मिळतं. पण तसं अजिबात नाही. मी नेहमीच मेहनतीला प्राधान्य देते. मला नक्की काय करायचं हे माझ्या डोक्यात स्पष्ट असतं. मला माझ्या आईचा वारसा पुढे न्यायचा आहे." पुढे ती म्हणाली, "कदाचित मला काही संधी सहज मिळाला असतील पण याने मला नुकसानच झालं आहे. प्रेक्षक माझा चित्रपट तटस्थपणे बघायला जात नाहीत. जे लोक माझ्या मेहनतीकडे फारसं लक्ष देत नाहीत त्यांना मी एकच सांगू इच्छिते की ही प्रत्येक भूमिका खूप मेहनत घेऊन साकारते. आतापर्यंत मला जे मिळाला आहे याची मला जाण आहे. माझ्या मनात चित्रपटांबद्दल प्रेम आहे. मी जे काम करते त्याचा मला समाधान आहे कारण मला माहित आहे की मी जे करते ते चांगलं आहे." आता जान्हवी कपूरचं हे बोलणं चांगलंच चर्चेत आलं आहे.



# बॉक्स ऑफिसवर 'पठाण'चाच दबदबा

बॉलिवूडचा किंग खान म्हणजेच शाहरुख खानने चार वर्षांच्या ब्रेकनंतर 'पठाण' चित्रपटातून रुपेरी पडद्यावर पुनरागमन केले आणि या चित्रपटाने इतिहास रचला. किंग ऑफ रोमान्सचा स्पाय ॲक्शन थ्रिलर चित्रपट 'पठाण' रिलीज झाल्यापासून बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घालत आहे. 'पठाण'ची रेकॉर्डब्रेक कमाई सुरू आहे. 'पठाण' रिलीजच्या दोन आठवड्यात ब्लॉकबस्टर ठरला आहे. बॉलीवूडमधील सर्वाधिक कमाई करणाऱ्या 'पठाण' या चित्रपटाने 14 व्या दिवशी किती कोटींची कमाई केली ते जाणून घेऊया. जगभरात सर्वाधिक कमाई करणाऱ्या चित्रपटाचा विक्रम करणाऱ्या शाहरुख खानच्या 'पठाण'ची दमदार कामगिरी सुरूच आहे. या चित्रपटाने रिलीजच्या पहिल्याच दिवशी बॉक्स ऑफिसवर 55 कोटींचा विक्रम केला आहे. या चित्रपटाने 12 दिवसांत बॉक्स ऑफिसवर 400 कोटींहून अधिक कमाई केली. त्याचबरोबर चित्रपटाच्या 14व्या दिवसाचे आकडेही समोर आले आहेत. रिपोर्टनुसार, 'पठाण'ने रिलीजच्या 14व्या दिवशी 7.80 कोटींचा गल्ला जमवला आहे. यासह, शाहरुख खान स्टारर चित्रपटाची एकूण कमाई आता 446.25 कोटींवर गेली आहे. यासोबतच बुधवारी हा चित्रपट 450 कोटींचा टप्पा पार करेल.



# समांथा रुथ प्रभूने मुंबईत खरेदी केलं नवं घर


कलाकार नेहमीच त्यांच्या चित्रपटांबरोबरच त्यांच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत असतात. त्यांच्या आयुष्यात काय चाललंय हे जाणून घेण्यासाठी त्यांचे चाहते नेहमीच उत्सुक असतात. याचबरोबर लक्ष वेधून घेते ते त्यांच्याकडे असलेली प्रॉपर्टी. कलाकारांची आलिशान घरं नेहमीच चर्चेचा विषय ठरतात. आता दाक्षिणात्य अभिनेत्री समांथा रुथ प्रभु हिने एक आलिशान घर खरेदी केलं आहे. ज्याची किंमत ऐकून नेटकरी आवाक् झाले आहेत. अभिनेत्री समांथा रुथ प्रभू हिने दाक्षिणात्य चित्रपटांमध्ये आपली छाप निर्माण करताना बॉलिवूडमध्येही स्वतःचा दबदबा निर्माण केला आहे. तिने हिंदी चित्रपटांमध्ये जरी काम केलं नसलं तरी बॉलिवूड चित्रपट पाहणारे असंख्य प्रेक्षक तिचे चाहते आहेत. तिचे नाव आज भारतातल्या आघाडीनकीय अभिनेत्रींच्या यादीत घेतले जाते. तिच्याबद्दल जाणून घेण्यासाठी तिचे चाहते नेहमीच उत्सुक असतात. आता नुकताच तिने मुंबईत नवीन घर घेतलं आहे.काही दिवसांपूर्वीच समाथाने तिच्या सोशल मीडिया अकाउंटवर तिचा एक फोटो पोस्ट केला होता. यात तिच्या मागे एक सुंदर सनसेट व्ह्यू दिसत होता. हा फोटो कोणत्याही फाईव्ह स्टार हॉटेलमधला नसून तिच्या नवीन घरामध्ये काढलेला होता. तिने मुंबईत एक नवं घर खरेदी केला आहे. रिपोर्टनुसार तिने मुंबईमध्ये एक आलिशान 3 BHK चा फ्लॅट घेतला आहे. या फ्लॅटला सी फेसिंग व्ह्यू आहे असंही बोललं जातं. याची किंमत जवळजवळ १५ कोटी आहे. पण अद्याप याबाबत कुठलीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही. दरम्यान समांथा लवकरच वरून धवन बरोबर 'सिटाडेल' या चित्रपटामध्ये झळकणार आहे. सध्या या चित्रपटाचे शूटिंग मुंबईत सुरू आहे. या चित्रपटाच्या माध्यमातून ती हिंदी सिनेसृष्टीत पदार्पण करणार आहे.



# रणबीर कपूरपासून अनुष्का शर्मापर्यंत, या बॉलिवूड सेलिब्रिटींनी त्यांच्या एक्सच्या लग्नाला लावली हजेरी

ते दिवस गेले जेव्हा लोक त्यांचे संबंध संपवून त्यांच्या एक्ससोबतचे सर्व नाते तोडायचे. बॉलीवूडचे असे अनेक सेलिब्रिटी आहेत, जे आज, विभक्त असूनही, त्यांचे एक्ससोबत चांगले बॉन्ड आहे. केवळ ते एक्सचे मित्रच नाहीत तर ते त्यांच्या लग्नालाही आनंदाने उपस्थित राहिले आहेत.

डिनो मोरिया आणि बिपाशा बसू हे एकेकाळी बॉलीवूडमधील सर्वात लोकप्रिय जोडप्यांपैकी एक होते. 'राज' कपल 1996 ते 2002 पर्यंत रिलेशनशिपमध्ये होते. दोघांचे चाहते त्यांच्या लग्नाची वाट पाहत होते.



नंतर त्यांचे ब्रेकअप झाले आणि त्यानंतर दोघेही त्यांच्या आयुष्यात पुढे गेले. डिनो आणि बिपाशा एकमेकांचे चांगले मित्र राहिले. नंतर बिपाशाने करण सिंग ग्रोवरसोबत लग्न केले आणि डिनोनेही या जोडप्याच्या लग्नाला आनंदाने हजेरी लावली.

रणबीर कपूर आणि सोनम कपूर यांनी संजय लीला भन्साळी यांच्या सावरिया या चित्रपटातून बॉलिवूडमध्ये



पदार्पण केले. मीडिया रिपोर्ट्सनुसार, दोघेही डेट करत होते. रिपोर्ट्सनुसार, त्यांचे नाते चांगल्या नोटवर संपले नाही.

असे असूनही वर्षांनंतरही रणबीरने सोनम कपूरच्या लग्नाला हजेरी लावायला मागेपुढे पाहिले नाही. त्यावेळी अभिनेता आलिया भट्टसोबत सोनमच्या लग्नात सहभागी झाला होता. सोनमने तिचा लाँग टाइम बॉयफ्रेंड आणि बिझनेसमन आनंद आहुजासोबत लग्न केले आहे.रिपोर्ट्सनुसार, अभिनेत्री दीपानिता शर्मने '16 डिसेंबर' आणि 'जोडी ब्रेकर्स'चा सह-अभिनेता मिलिंद सोमणला डेट केले. जरी त्यांनी कधीही त्यांच्या नात्याची पुष्टी केली नसली तरी, पडद्यावरची त्यांची केमिस्ट्री त्यांच्या रोमान्सच्या अफवांना चालना देते.

मिलिंदने त्याच्या कथित गर्लफ्रेंड दीपानिता आणि बिपाशा बसूसोबत फ्लॅट शेअर केला होता. मिलिंदने अंकिता कोंवरशी लग्न केले तेव्हा दीपानिता अलिबागमध्ये त्यांच्या लग्नात सहभागी झाली होती.

मीडिया रिपोर्ट्सनुसार, रणवीर सिंह धर्मेंद्र आणि हेमा मालिनी यांची मुलगी अहाना देओलला डेट करत होता. ते थोड्या काळासाठी रिलेशनशिपमध्ये होते आणि नंतर त्यांचे ब्रेकप झाले. विभक्त झाल्यानंतरही ते मित्र राहिले.

# गॅरी बॅलेन्सने वेस्ट इंडिजविरुद्ध शतक झळकावत रचला इतिहास!

।नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**झिम्बाब्वेचा खेळाडू गॅरी बॅलेन्सने वेस्ट इंडिजविरुद्ध शतक झळकावत इतिहास रचला आहे. कसोटी क्रिकेटमध्ये दोन देशांसाठी शतक झळकावणारा तो जगातील दुसरा खेळाडू आहे. झिम्बाब्वेकडून गॅरी बॅलेन्सने बुलावायोमध्ये वेस्ट इंडिजविरुद्ध शतक झळकावले. त्याने यापूर्वी इंग्लंड संघाकडून आंतरराष्ट्रीय क्रिकेटही खेळले असून कसोटी क्रिकेटमध्येही त्याने अनेक शतके झळकावली आहेत.**

## ‘ही’ कामगिरी करणारा जगातील दुसराच खेळाडू



गॅरी बॅलन्सपूर्वी दक्षिण आफ्रिकेच्या केप्लर वेसेल्सने हा करिष्मा केला होता. दक्षिण आफ्रिकेशिवाय केपलर वेसेल्सनेही ऑस्ट्रेलियासाठी कसोटी क्रिकेटमध्ये शतक झळकावले होते. वेसल्सने ऑस्ट्रेलियासाठी ४ आणि दक्षिण आफ्रिकेसाठी २ कसोटी शतके झळकावली आहेत. त्याचबरोबर गॅरी बॅलन्सने इंग्लंडसाठी ४ शतके आणि आता झिम्बाब्वेसाठी पदार्पणाच्या सामन्यात पहिले शतक झळकावले आहे. त्याने आणखी दोन शतके झळकावल्यावर तो इतिहास रचेल.

वेस्ट इंडिजविरुद्ध गॅरी बॅलन्सने झिम्बाब्वे संघासाठीचा फॉलोऑन तर टाळलाच, पण शतकासह संघाला सुस्थितीत आणले.

त्याने २३१ चेंडूचा सामना करताना १२ चौकार आणि २ षटकारांच्या मदतीने १३७ धावा केल्या. मात्र, चार दिवसांचा खेळ संपत आल्याने या सामन्याचा निकाल लागण्याची शक्यता कमी आहे. पाहुण्या संघ वेस्ट इंडिजकडे निश्चितपणे ८९ धावांची आघाडी आहे, पण कॅरेबियन संघ डाव लवकर घोषित करण्याच्या मनस्थितीत नसेल.

जर वेस्ट इंडिज संघाने सामन्याच्या पाचव्या दिवशी किमान ४५-५० षटके खेळून डाव घोषित केला आणि झिम्बाब्वेसमोर लक्ष्याचा पाठलाग केला तर सामन्याचा निकालही समोर येऊ शकतो.

या स्थितीत झिम्बाब्वे संघ धावा करण्याचा प्रयत्न करेल. अशा स्थितीत विकेट पडण्याची शक्यता असेल. तसेच, अनेक जर-तर होण्याच्या शक्यता अत्यंत कमी आहेत.

# महिला आयपीएल लिलावाबद्दल मोठी घोषणा

## यंदा 4 मार्च ते 26 मार्च दरम्यान मुंबईत महिला प्रीमियर लीग होणार

।तुर्कस्तान।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।




भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (BCCI) महिला प्रीमियर लीग (WPL) च्या पहिल्या सत्राच्या लिलावाबाबत मोठी घोषणा केली आहे. आयपीएलच्या धर्तीवर यंदा ४ मार्च ते २६ मार्च दरम्यान मुंबईत महिला प्रीमियर लीग होणार आहे. या स्पर्धेच्या पहिल्या हंगामासाठी लिलाव कधी आणि कुठे होणार आणि लिलावासाठी किती खेळाडू निवडले गेले आहेत. त्याची माहितीही समोर आली आहे.

सोमवारी, बीसीसीआयने महिला प्रीमियर लीगच्या पाच फ्रँचायझींना पाठवलेल्या मेलमध्ये, स्पर्धेसाठी मुंबईतील दोन स्टेडियम वापरण्यात येणार असल्याची पुष्टी करण्यात आली. यामध्ये ब्रेबॉर्न स्टेडियम आणि डीवाय पाटील स्टेडियम उपस्थित राहणार आहेत. संघांना जास्त प्रवास करावा लागू नये, म्हणूनच मुंबईच्या दोन स्टेडियमची निवड करण्यात आली आहे.बीसीसीआयचे सीईओ हेमांग अमीन यांनी सांगितले की, या स्पर्धेसाठी एकूण १५०० खेळाडूंनी नोंदणी केली होती. यातून एकूण ४०९ खेळाडूंची लिलावासाठी निवड करण्यात आली आहे. १३ फेब्रुवारीला होणाऱ्या या लिलावात २४६ भारतीय आणि १६३ परदेशी खेळाडूंचा लिलाव होणार आहे. यामध्ये २०२ कॅप्ड आणि १६३ अनकॅप्ड खेळाडू आहेत. एकूण ९० खेळाडू खरेदी केले जातील, ज्यामध्ये ६० भारतीय आणि ३० विदेशी खेळाडूंचा समावेश असेल. सर्व संघांच्या पथकात १७ खेळाडूंचा समावेश असेल.

दक्षिण आफ्रिकेत विश्वचषक जिंकणारे भारताचे अंडर-19 स्टार देखील या लिलावाचा भाग असतील. त्यात अनकॅप्ड पार्शवी चोप्रा, अर्चना देवी, तितास साधू, श्वेता सेहरावत आणि मन्नत कश्यप (सर्वांसाठी १० लाख रुपये मूळ किंमत) यांचा समावेश आहे.

### 50 लाख रुपये ही सर्वोच्च आधारभूत किंमत आहे

**मूळ किंमत ५० लाख रुपये आहे. या प्रकारात एकूण २४ खेळाडूंचा समावेश करण्यात आला आहे. त्यामध्ये हरमनप्रीत, शफाली , स्मृती , दीप्ती, जेमिमा, डिव्हाईन, एक्लेस्टोन, ॲशले गार्डनर, पेरी, स्क्राइव्हर, रेणुका, लॅनिंग, पूजा, डॉटिन, डॅनी व्याट, रिचा, एलिसा, जेस जोनासेन, स्नेह राणा, ब्रुट, मेघना सिंग, डार्सी. ब्राउन आणि लॉरिन फिरी यांचा समावेश आहे.**

# नाशिकच्या मुलींनी घडविला इतिहास!

। नाशिक । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

येथील मीनाताई ठाकरे विभागीय क्रीडासंकुलात सुरू असलेल्या १७ वर्षांआतील शालेय राज्यस्तरीय खो-खो स्पर्धेच्या अंतिम सामन्यात नाशिकच्या मुलींनी बाजी मारत अजिंक्यपद पटकाविले आहे. खो- खोच्या इतिहासात प्रथमच मुली अजिंक्य ठरल्या आहेत.मुलींचा अंतिम सामना नाशिक आणि कोल्हापूर विभागात झाला. नाणेफेक हरल्यामुळे नाशिक विभागाने पहिल्या आक्रमणात प्रतिस्पर्धी कोल्हापूर विभागाचे आठ गडी बाद केले. नाशिककडून कर्णधार सरिता दिवा हिने तीन गडी, ऋतुजा सहारे दोन गडी, तर सुषमा चौधरी व तेजल सहारे यांनी प्रत्येकी एक गडी बाद केला.

कोल्हापूर विभाग मात्र नाशिकच्या संरक्षणाची अभेद्य कडी भेदू शकले नाही. संरक्षण करताना सरिता दिवा तीन मिनीट ५० सेकंद, सुषमा चौधरी तन मिनीट आणि सोनाली पवार नाबाद दोन मिनीट दहा सेकंद यांच्या दमदार खेळीमुळे मध्यंतराला नाशिकच्या संघाकडे सहा गुणांची विजयी आघाडी होती.

दुसऱ्या डावात नाशिककडून ज्योती मेढे तीन मिनीट, ऋतुजा सहारे तीन मिनीट २० सेकंद, दीपिका बोरसे दोन मिनीट यांच्या सुंदर खेळीमुळे कोल्हापूर विभाग नाशिकचे केवळ तीन खेळाडू बाद करू शकला.

अमृता पाटील आणि आरती पाटील यांची चांगली खेळी केली.

